**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय**

---

## जाहीर सूचना

अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाअंतर्गत मुख्य कार्यालय, मुंबई, ६ प्रादेशिक कार्यालये व ३६ जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमध्ये **Periodic Labour Force Survey (PLFS) व Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (ASUSE) ही सांख्यिकी सर्वेक्षणे व अनुषंगिक इतर कामकाज पार पाडण्यासाठी** सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी (**उपसंचालक व संशोधन अधिकारी / सहाय्यक संशोधन अधिकारी**) यांच्या सेवा करार पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. **त्यासाठी** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक १०/०६/२०२५ मधील अटी व शर्तीनुसार नामिकासूची तयार करण्यासाठी पात्र व इच्छुक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर जाहीरात अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या https://mahaces.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पहावी.

**अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती :**
अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://mahaces.maharashtra.gov.in प्रसिद्ध करण्यात आलेल्या सविस्तर जाहिरातीत नमूद केलेल्या पात्रता, वयोमर्यादा धारण करणा-या इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांनी जाहीरातीतील अटी तसेच सूचनांनुसार विहित नमुन्यात **दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत** स्वत: साक्षांकीत केलेले अर्ज सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे, अपूर्ण किंवा अटींची पूर्तता न करणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारार्थ घेतले जाणार नाहीत. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. प्राप्त झालेल्या अर्जांची आवश्यक ती पडताळणी करुन मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवारांना मुलाखतीकरिता कोणताही प्रवास भत्ता देय राहणार नाही. उमेदवार निवडी बाबतचा अंतिम अधिकार अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांचा राहील.

**दिनांक : १६/१०/२०२६**
**स्थळ : मुंबई**

**स्वाक्षरी/-**
**डॉ.ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,**
**मुंबई**

पत्ता : नवीन प्रशासन भवन, १८ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२०००३, Email-ID: commissioner.es@maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय

---

# जाहिरात

अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयांतर्गत मुख्य कार्यालय, मुंबई, ६ प्रादेशिक कार्यालये व ३६ जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमध्ये Periodic Labour Force Survey (PLFS) व Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (ASUSE) ही सांख्यिकी सर्वेक्षणे व अनुषंगिक इतर कामकाज पार पाडण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी (**उपसंचालक** व **संशोधन अधिकारी / सहाय्यक संशोधन अधिकारी**) यांच्या सेवा करार पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील अटी व शर्तीनुसार नामिकासूची तयार करण्यासाठी पात्र व इच्छुक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विवक्षित कामाचे स्वरुप | वय, पात्रता व अनुभव |
|---|---|---|
| १. | PLFS व ASUSE या दोन सांख्यिकी सर्वेक्षणांचे नियोजन, अंमलबजावणी, देखरेख इ.करणे व त्या अनुषंगाने इतर कामे | **वय** - जाहिरातीच्या दिनांकास जास्तीत जास्त ६४ वर्षे<br>**अनुभव** - विविध सांख्यिकीय सर्वेक्षणांचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव<br>**पात्रता** - शारीरीक मानसिक व आरोग्यदृष्ट्या सक्षम. विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी. चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |
| २. | PLFS व ASUSE या दोन सांख्यिकी सर्वेक्षणांसंदर्भात संशोधनात्मक, विश्लेषणात्मक व सहाय्यक स्वरूपाची सांख्यिकीय कामे (क्षेत्रीय कामांसह) | |

## नियुक्तीच्या अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील तरतूदीनुसार करण्यांत येतील.

२) करार पध्दतीने नेमणूक करताना सेवानिवृत्त अधिकाऱ्यास नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्ती वेतन (अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रकम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. तसेच सदर शासन निर्णयानुसार आर्थिक लाभ देण्यांत येतील.

३) सदर नियुक्ती केवळ १२ महिन्यांच्या कालावधीकरिता असेल.

४) नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

६) इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज भरुन आवश्यक त्या अनुभवाच्या प्रमाणपत्रासह पोस्टाच्या RPAD सेवेद्वारे **दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत** आयुक्तालयास पाठविण्यात यावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. विभागास आवश्यक असलेली पात्रता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

७) प्रत्येक जिल्ह्यासाठी नामिकासूची तयार करण्यासाठी मुलाखतीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयुक्तालयाचा राहील. तथापि **पुणे, सोलापूर व कोल्हापूर** ह्या जिल्ह्यांकरिता उमेदवारांच्या निवडीचा विचार प्रामुख्याने केला जाईल.

८) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

९) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दि.१०/०६/२०२५ नुसार अहर्ता व अनुभव धारण करणा-या सेवानिवृत्त अधिका-यांची सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार निवड प्रक्रिया राबवून नियुक्ती करण्यात येईल. नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यांना सदर शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू होतील व त्यांना सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते देण्यात येतील.

११) अर्ज प्राप्त होण्याच्या क्रमवारीनुसार मुलाखत घेण्यात येईल. तसेच कोणताही कारण न देता अर्ज **स्वीकारण्याचा / नाकारण्याचा / नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार** आयुक्तालयास राहील.

**अर्ज करण्याचा व संपर्काचा पत्ता :- अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१**

**स्वाक्षरी/-**
**डॉ.ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,**
**मुंबई**

## अर्जाचा नमुना

**अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या विविध कार्यालयात शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा विवक्षित कामासाठी करार पध्दतीने घेण्यासाठी नामिकासूची तयार करण्यासाठी अर्जाचा नमुना.**

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-

| उमेदवाराचे अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता:-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम:-

४. भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी :-

५. जन्म दिनांक व वय:-

६. आयुक्तालयास आवश्यक पात्रता अर्जदाराकडे आहे का? होय/नाही

**७. शासन सेवेसंबंधी माहिती :**

शेवटचे पद व वेतनश्रेणी : ____________________________________________

सेवेतील शेवटचे कार्यालय / विभाग : _____________________________________

सेवानिवृत्ती दिनांक : _________________________

सेवानिवृत्ती आदेश (क्रमांक/दिनांक) : ___________________________________

पेंशन पेमेंट ऑर्डर (PPO) क्रमांक : ___________________________________

सेवानिवृत्तीवेळी कोणतीही विभागीय चौकशी / शिस्तभंगाची कारवाई :

☐नाही ☐होय (तपशील द्यावेत): ________________________________________

**८. अनुभव व कार्यकौशल्य (अत्यावश्यक) :**

(सांख्यिकी/योजना/प्रशासन/लेखा/सर्वेक्षण/क्षेत्रीय काम इ. नुसार तपशील)

एकूण शासकीय सेवा कालावधी : ___________________ वर्ष ______ महिने

संबंधित क्षेत्रातील अनुभव : ____________________________________________

कार्यक्षेत्र/जबाबदाऱ्या/अनुभव (थोडक्यात):

**९. करार सेवेसाठी उपलब्धता :**

कोणत्या कार्यालयात सेवा देण्यास प्राधान्य -

(१) जिल्हा सांख्यिकी कार्यालय :

(२) प्रादेशिक आयुक्त कार्यालय :

(३) मुख्य कार्यालय, मुंबई :

**१०.आवश्यक संलग्न कागदपत्रे :**

✓सेवानिवृत्ती आदेश

✓PPO / वेतन व पेन्शन तपशील

✓ओळख पुरावा (Aadhaar/PAN)

✓२ पासपोर्ट आकाराचे फोटो

✓इतर (असल्यास): ______________________________________

**स्वघोषणा (Self Declaration) :**

मी, खाली सही करणारा/करणारी, वरील माहिती माझ्या माहितीनुसार अचूक असून शासन नियमांनुसार करार पद्धतीने सेवा देण्यास तयार आहे. उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

(अर्जदाराचे नाव): ________________________

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी

**प्रति,**
**आयुक्त,**
**अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,**
**प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,**
**शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.**